(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# पुनवत परिसरातील ग्रामीण शेतमजूर महिलांचे आर्थिक व्यवस्थापन : समाजशास्त्रीय अभ्यास

**- सागर दगडू मोहिते.**

**- अभिजीत भिमराव चव्हाण.**

---

I) **प्रस्तावना** :

मुलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी मानव विशिष्ट स्वरूपाच्या आर्थिक गरजांची पूर्तता करत असतो. तसेच आपल्या गरजांची पूर्तता ही एकट्याने पूर्णत्वास जाऊ शकत नाही याची जाणीव झाल्यानेच तो समूहाने राहू लागला. परस्पर सहकार्य व परस्परावलंबीत्व या बाबी जगण्याचा भाग बनला. गरजांच्या पूर्ततेसाठी समाजाने मान्य केलेली आर्थिक क्रियांची व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय. अश्मयुगापासून ते आजच्या औद्योगिक युगापर्यंत मानव नेहमीच आर्थिक क्रिया करीत आला आहे परंतु काळानुरूप आर्थिक क्रियांचे स्वरूप भिन्न-भिन्न असल्याचे दिसून येते. लोक संघटितपणे ज्या ज्या आर्थिक क्रिया करतात त्या आर्थिक क्रियांच्या संघटनास अर्थव्यवस्था असे म्हणतात.

1991 साली भारताने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. जागतिकीकरणानंतर भारतीय समाजात लक्षणीय बदल घडून आले. ग्रामीण जीवनावर, कृषी व्यवस्थेवर जागतिकीकरणाचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. जागतिकीकरणानंतर शेतीमध्ये आधुनिक साधनांचा, यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तंत्रज्ञानाचा विकास झाला असला तरी देखील यंत्राच्या माध्यमातून शेतीतील सर्वच कामे करता येत नाहीत. त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता लागतेच. शेतीतील मनुष्यबळाची ही आवश्यकता ज्या लोकांना जमिनी नाहीत किंवा उदरनिर्वाहाचे दुसरे साधन नाही अशा व्यक्ती इतर लोकांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करण्यास जातात. यातूनच शेतमजूर हा असंघटित समूह निर्माण झाला. ग्रामीण भागात शेतकऱ्याबरोबरच शेतमजूर ही महत्त्वाचा मानला जातो कारण शेतात काम करण्यासाठी जर शेतमजूरच आले नाहीत तर एकटा शेतकरी शेतीची कामे करू शकत नाही. शेतीची कामे करण्यासाठी शेतकरी शेतमजुरांचा वापर करून घेतो तर शेतमजूर ही कामे करून मिळणाऱ्या मोबदल्यातून आपला उदरनिर्वाह चालवतात. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर हे एकमेकांना सहाय्यभूत ठरतात व एकमेकांवर अवलंबून असतात. वाढलेली महागाई, बेरोजगारी यामुळे दैनंदिन जीवनातील जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणेही कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांचे आर्थिक व्यवस्थापन जाणून घेण्याच्या उद्देशाने सदर संशोधन हाती घेतले आहे

**II) उद्दिष्टे**

1. शेतमजूर स्त्रियांच्या आर्थिक अडचणी समजून घेणे.
2. शेतमजूर महिलांचे आर्थिक व्यवस्थापन जाणून घेणे.
3. शेतमजुरी बाबत शेतमजूर महिलांची मते जाणून घेणे.

**III) संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी आशय विश्लेषण पद्धतीचा वापर केला आहे

**IV) नमुना निवड**

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील पुनवत परिसरातील 50 शेतमजूर महिलांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने सदर संशोधनासाठी निवड केली

**V) तथ्य संकलनाचा कालावधी**

25 जानेवारी 2025 ते 28 जानेवारी 2025 या कालावधीत पुनवत परिसरातील 50 शेतमजूर महिलांना प्रत्यक्ष भेटून सदर प्रश्नावली भरून घेतल्या

**VI) तथ्यांचे विश्लेषण**

सारणी क्र. : ०१

शेतामजुरीतून आर्थिक गरजांची पूर्तता

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १० | २० |
| नाही | ४० | ८० |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक एक वरून असे निदर्शनास येते की, शेतमजुरी करून आर्थिक गरजा भागवता येत नाहीत असे म्हणणाऱ्या महिलांचे प्रमाण हे ८०% आहे तर आर्थिक गरजांची पूर्तता होते असे सांगणाऱ्या महिला केवळ २०% आहेत. यावरून असे म्हणता येईल की फक्त शेतमजुरी करून शेतमजूर महिलांचा अर्थनिर्वाह समाधानकारक होत अनही.

सारणी क्र. : ०२

शेतामजुरीतून पाल्यांच्या शिक्षणास मदत

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४५ | ९० |
| नाही | ०५ | १० |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक दोन वरून असे निदर्शनास येते की, शेतमजुरीतून मिळणाऱ्या मोबदल्यातून पाल्यांच्या शिक्षणास मदत होत असल्याचे मत ९०% महिलांनी वक्त केले तर मदत होत नाही असे मत १० % महिलांनी मांडले. त्यामुळे केवळ शेतमजुरी करून लोकांच्या अर्थनिर्वाह होत नसला तरी पाल्यांच्या शिक्षणविषयक गरजा भागवण्यासाठी शेतमजुरी उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते.

सारणी क्र. : ०३

शेतामजुरीतून भविष्याचे आर्थिक व्यवस्थापन

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ०३ | ०६ |
| नाही | ४७ | ९४ |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक तीन वरून असे दिसून येते की शेतमजुरी करून भविष्याचे आर्थिक व्यवस्थापन होणार नसल्याचे ९४% महिलांनी नमूद केले आहे यावरून शेतमजूर स्त्रियांच्या भविष्याचे आर्थिक व्यवस्थापन होण्यासाठी शेतमजुरी पुरेशी नसल्याचे स्पष्ट होते.

सारणी क्र. : ०४ शेतमजुरीच्या मोबदल्यात वाढ

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ०३ | ०६ |
| नाही | ४७ | ९४ |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक चार वरून हे स्पष्ट होते की, सध्या मिळणाऱ्या शेतमजुरीच्या मोबदल्याबाबत ९४% महिला समाधानी नाहीत. यावरून सध्या शेतमजुरीसाठी मिळणारा मोबदला दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यास सक्षम ठरत नाही.

सारणी क्र. : ०५

महिला बचत गटाचे सदस्यत्व

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५ | ७० |
| नाही | १५ | ३० |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक पाच वरून असे म्हणता येईल की शेतमजूर महिला त्यांना मिळणाऱ्या शेतमजुरीच्या मोबदल्यामधून काही रक्कम या भविष्यकालीन गरजांच्या पूर्ततेसाठी बचत गटाच्या माध्यमातून संरक्षित करीत आहेत. त्यांचे प्रमाण ७०% इतके आढळून आले.

सारणी क्र. : ०६

आकस्मित गरजांसाठी कर्ज

| | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४८ | ९६ |
| नाही | ०२ | ०४ |
| **एकूण** | **५०** | **१००** |

सारणी क्रमांक सहा वरून असे निदर्शनास येते की, अचानक उद्भवलेल्या

आर्थिक संकटासाठी बचत गटाच्या माध्यमातून किंवा इतर वित्तीय संस्थांच्या माध्यमातून कर्ज घेणाऱ्या महिलांची संख्या ही ९६% इतकी आहे. यावरून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यामध्येच मजुरी संपत असल्याचे दिसून येते त्यामुळे आकस्मितपणे आलेल्या आर्थिक संकटासाठी कर्ज घेणे हाच पर्याय सदरहू शेतमजूर महिलांसमोर असलेला दिसून येतो

**VII) निरीक्षणे**

1. शेतमजुरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक गरजांची पूर्तता तसेच आर्थिक गरज शेतमजुरीच्या माध्यमातून पूर्ण होत नसल्याचे नसल्याचे आढळले.
2. शेतमजुरीतुन मिळणाऱ्या मोबदल्यातून कुटुंबाची पूर्णता आर्थिक गरज पूर्ण होत नसली तरी पाल्यांच्या शिक्षणासाठी शेतमजुरीतून मिळणारा मोबदला सहाय्यभूत ठरत असल्याचे दिसते.
3. कौटुंबिक गरजांच्या पूर्ततेसाठी केवळ शेतमजुरीतून मिळणारा मोबदला भविष्यकालीन आर्थिक व्यवस्थापनासाठी पुरेसा नसल्याचे दिसते.
4. शेतमजूर म्हणून शेतीतील कामासाठी मिळणारा मोबदल्याबाबत असमाधानी असलेल्या शेतमजूर महिलांची संख्या सर्वाधिक आहे.
5. बहुतांश शेतमजूर महिला या बचत गटाच्या सदस्य असल्याचे दिसून आले मिळणाऱ्या मोबदल्यातील काही रक्कम भविष्यकालीन गरजांसाठी राखीव ठेवताना आढळले.
6. आकस्मितपणे आलेल्या गरजांसाठी कर्ज काढणे हाच पर्याय शेतमजूर महिलांसमोर असल्याचे दिसून येतो.
7. केवळ शेतमजुरीतून मिळणारा मोबदला कौटुंबिक खर्चासाठी तसेच भविष्यकालीन गरजांसाठी पुरेसा नसल्याने शेतमजुरी बरोबरच इतर व्यवसाय करण्याची इच्छा या शेतमजूर महिलांमध्ये असल्याचे निदर्शनास आले.

**VIII) निष्कर्ष**

1. शेतमजूर स्त्रियांच्या भविष्याचे आर्थिक व्यवस्थापन शेतीतून मिळणाऱ्या मोबदल्यावर होणे शक्य नाही.
2. मुलांच्या शिक्षणामध्ये शेतमजूर महिलांना शेतमजुरीतून मिळणारा मोबदला हा प्रमुख वाटा असतो.
3. शेतमजूर महिलांना शेतमजुरीच्या कामाच्या मोबदल्यात मिळणारा मोबदला हा अत्यंत आहे.
4. शेतमजूर महिलांचे बचत गटाचे सदस्यत्व असणे हे त्यांच्या कुशल काटकसरी जीवनाचे द्योतक आहे.
5. केवळ शेतमजुरीतून मिळणारा मोबदला हा कौटुंबिक गरजांसाठी पुरेसा नसल्याने व पर्यायाने कर्ज घेणे क्रमप्राप्त असल्याने या शेतमजूर स्त्रिया कर्जाच्या ओझ्याखाली दबल्या जात आहेत.

**IX) संदर्भ**

1. Mugadur.N.S, and Hiremat R.C.Socio Economic Condition of Agriculture Women Labour: A Case study , Indian journal of Research PARIPEX, Vol- 3 Issue-4, pp 50-52,(2014).
2. पाटील, लीला, "कृषी अर्थशास्त्राची मुलतत्वे", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८०.
3. पाटील, दिनेश, घाटगे, जयंत, "समाजशास्त्र", कोल्हापूर, पंचगंगा प्रकाशन, 2001.